**भारत -ग्रीस सागरी सुरक्षा संवादाचे उद्‌घाटन (डिसेंबर 11, 2025)**

11 डिसेंबर 2025

पहिला भारत-ग्रीस सागरी सुरक्षा संवाद 11 डिसेंबर 2025 रोजी एथन्स, ग्रीस येथे पार पडला. बैठकीच्या सुरूवातीला ग्रीसच्या परराष्ट्र व्यवहार उप मंत्री राजदूत एलेक्झांड्रा पापादोपोलू यांनी आपले विचार व्यक्त केले. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाच्या सह सचिव (निःशस्त्रीकरण व आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार) कु. मुआनपुई साइवी यांनी केले. ग्रीक शिष्टमंडळाचे नेतृत्व राजकीय संचालक राजदूत आंद्रियास फ्रिगनास आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या संयुक्त राष्ट्रासाठीच्या कृती दलाच्या प्रमुख राजदूत मारिया थिओफिली यांनी केले.

2. उभय बाजूंनी यावेळी भूमध्य, आर्क्टिक व इंडो-पॅसिफिक क्षेत्रांतील सागरी वातावरणावर चर्चा केली. द्विपक्षीय सहकार्य तसेच बहुपक्षीय मंचांमधील सहभागाद्वारे आर्थिक विकास व समृद्धीसाठी अनुकूल सुरक्षित सागरी वातावरण कसे राखता येईल यावर दोन्ही देशांनी चर्चा केली. सागरी क्षेत्रातील वाढती जागरूकता, सागरी अर्थव्यवस्थेचा शाश्वत विकास, मानवतावादी साहाय्य व आपत्ती साहाय्य, नौदल सहकार्य तसेच जहाजाच्या क्षेत्रांमधील वाढत्या सहभागाद्वारे सागरी जोडणी सुधारणे यांच्या दृष्टीने सहकारासाठी विविध घटकांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

3. सागरी क्षेत्रातील सर्व आघाड्यांवर हे संबंध अधिक मजबूत करण्याची उभय बाजूंनी इच्छा व्यक्त केली आणि या संवादाची पुढील फेरी नवी दिल्ली येथे परस्परांच्या सोयीच्या तारखेला घेण्यावर सहमती दर्शविली, जेथे या ऐतिहासिक प्रारंभीच्या संवादातील सहमत विषयांवर चर्चा होईल

एथन्स

11 डिसेंबर 2025